# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अमरावती शहराच्या भुयारी जलविस्तारणाचा निर्णय

**(१) १५६० (२३-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराच्या भुयारी जलविस्तारणाच्या दिनांक २४ नोव्हेंबर,१९९७ च्या शासन निर्णयान्वये मंजूर प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प कार्यान्वीत झाला आहे काय,

(३) नसल्यास, हा प्रकल्प पूर्ण करण्याकरीता किती निधीची आवश्यकता आहे,

(४) असल्यास, हा प्रकल्प पूर्ण करण्याचे दृष्टीने काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :** (१) नाही.

(२) अंशत: कार्यान्वित झालेला आहे.

(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएमएसएमटी अंतर्गत मंजूर अमरावती भुयारी गटार प्रकल्प व त्यांची संलग्न कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने रु. २४.७५ कोटी इतका निधी मंजूर केला असून, त्यापैकी प्रथम हप्त्याचा निधी रु. १२.३८ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

### कोल्हापूर शहरांतर्गत नव्याने रस्ते तयार करण्याबाबत

**(२) ७१४४ (०८-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरांतर्गत नव्याने रस्ते करण्यासह तसेच दुरुस्तीसाठी शासनाने महानगरपालिकेला तत्कालिन शासनाने तब्बल १७ कोटींचा निधी जाहिर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधी सध्याच्या शासनाने रोखला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा निधी रोखण्याची कारणे काय आहेत, सदरचा निधी पुन्हा देण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी नगरपरिषदेची हद्दवाढ करण्यासंदर्भात हरकती सूचना मागविण्यात आल्याबाबत**

**(३) ८५३७ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी नगरपरिषदेची हद्दवाढ करण्यासंदर्भात हरकती सूचना मागविण्यासाठी प्राथमिक उद्घोषणा दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यास अनुसरून हरकती व सुचनांचा विचार करुन इचलकरंजी नगरपरिषदेची हद्दवाढ करण्याबाबत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांची शिफारस दिनांक ३१ मे, २०१२ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिफारशीच्या अनुषंगाने सदर हद्दीबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अभिप्राय प्राप्त होवून सुध्दा प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहण्याचा सर्वसाधारण कारणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :** (१) होय.
(२) इचलकरंजी नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबतची अंतिम अधिसूचना दि. २१/८/२०१४ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी नगरपरिषद हद्दीमध्ये अवैध बांधकामांवर मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती रक्कम आकारुन घरपट्टी आकारण्यास सुरुवात केल्याबाबत**

**(४) ८५३९ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी नगरपरिषद हद्दीमध्ये अवैध बांधकामांवर मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती रक्कम आकारुन घरपट्टी आकारण्यास सुरुवात केल्यामुळे अनेक मालमत्ताधारकांना तिप्पट घर पट्टीची देयके प्राप्त झाली असल्याने सदर शास्ती रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोद्यांकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी संचालक तथा आयुक्त, नगरपरिषद प्रशासन यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभिप्राय शासनाला प्राप्त झाला आहे काय व त्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) शास्ती न लावण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतुदीशी विसंगत असल्याने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी स्थगिती दिलीआहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्डुवाडी नगरपालिकेने (जि.सोलापूर) येथे माहे जानेवारी,२०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात दुकानासाठी असलेली खोकी हटवून बेदखल केल्याबाबत**

**(५) १०५८५ (०६-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डुवाडी नगरपालिकेने (जि.सोलापूर) येथे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात दुकानासाठी असलेली खोकी हटवून बेदखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खोकी धारकांना निधी मंजूर करुन ज्या ठिकाणी खोकी होती त्याच ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर खोकी धारकाचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१), (२), (३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या आदेशान्वये अतिक्रमण धारकांना पूर्वसूचना देऊन सदरचे अतिक्रमण काढण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण नगर परिषद (जि.रत्नागिरी) अधिपत्याखालील इंदीरा गांधी सांस्कृतिक केंद्राच्या दुरुस्ती - नुतनीकरणासाठी निधीबाबत**

**(६) १२४३४ (०७-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण नगर परिषद (जि.रत्नागिरी) अधिपत्याखालील इंदीरा गांधी सांस्कृतिक केंद्राच्या दुरुस्ती - नुतनीकरणासाठी निधी प्राप्त होऊनही प्रत्यक्ष कामास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सांस्कृतिक केंद्राची दुरुस्ती अभावी दुरावस्था झाली असून सांस्कृतिक कार्यक्रम होत नसल्यामुळे नागरीक व प्रेक्षक वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर सांस्कृतिक केंद्राच्या नुतनीकरणाचे काम होण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि. ७/५/२०१५ रोजी संबंधित कंत्राटदास देण्यात आले असून सद्य:स्थितीत नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा चंद्रपुर येथील राजूरा नगरपरिषद हद्दीतील वार्ड नं.१ (गढी वार्ड राजुरा) येथे विदर्भ वैद्यानिक विकास मंडळाच्या निधी अंतगत जलसंधारण तलावाचे बांधकाम अनुभव नसलेल्या कंत्राटदाराला दिल्याबाबत**

**(७) १४८२६ (०७-०४-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूरा नगरपरिषद (जि.चंद्रपुर) हद्दीतील वार्ड नं.१ (गढी वार्ड राजुरा) येथील विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या निधी अंतर्गत जलसंधारण तलावाचे बांधकाम अनुभव नसलेल्या कंत्राटदाराला दिल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कडून करण्याचे निर्देश तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कारवाई करण्यात आली वा येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जिल्हाधिकारी यांचेकडून चौकशी करण्यात आली असून तक्रारीत तथ्य नसल्याचा निर्णय घेण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथे महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेतून ड्रेनेज योजना हाती घेण्याबाबत**

**(८) १६५४१ (११-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथे महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेतून ड्रेनेज योजना हाती घेण्यात आली आहे. ७० टक्के शासन व ३० टक्के महानगरपालिकेच्या खर्चातून ही योजना साकारत आहे. आता या योजनेचा खर्च २४८ कोटीवर गेला आहे असे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खेरे आहे काय.
(२) असल्यास, उपरोक्त योजनेसाठी सोलापूर महानगरपालिकेला १४० कोटी उभे करावे लागणार आहेत, परंतू महानगरपालिकेला आपला हिस्सा भरण्यासाठी कर्ज काढावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उपरोक्त योजनेच्या पुर्ततासाठी कर्ज उभे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रकल्पासाठी रु.१८७.३६ कोटी मंजूरी देण्यात आली आहे, सदर योजनेचा फेर निविदा, कुमठे एस.टी.पी. जागा खरेदी इ. जादा रक्कम धरुन योजनेचा रु.२३२.३८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
(२), (३) व (४) सदर योजनेसाठी जादाचा खर्च धरुन सोलापूर महानगपालिकेला आपला हिस्सा रु.१०३.२३ कोटी उभा करावा लागणर असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेमार्फत सिंडिकेट बँके कडून कर्ज घेण्याबाबत आवश्यक प्रक्रिया करण्यात येत आहे.

---

**ठाणे येथील लोढा कॉम्प्लेक्स, माजिवडा, ठाणे येथे महानगरपालिका नागरी क्षेत्राकरीता मलनिस्सारणासाठी उदंचन व मलप्रक्रिया केंद्र बनविण्याबाबत**

**(९) २०८४१ (११-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोढा कॉम्प्लेक्स, माजिवडा येथील ठाणे महानगरपालिका नागरी क्षेत्राकरीता मल:निस्सारणासाठी उदंचन व मलप्रक्रिया केंद्र बनविण्याचे काम संथगतिने चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची सद्यस्थिती काय आहे, तसेच उदंचन केंद्र व मलप्रक्रिया केंद्र प्रत्यक्ष सुरु होण्यास अजून किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, सदर काम जलद गतीने पूर्ण होण्याकरीता शासनाकडून कोणती उपाय योजना केली जाणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

लोढा कॉम्पेक्स् येथील उदंचन केंद्राच्या कामासह इतर ६ उदंचन केंद्र, सुमारे ४६ कि.मी. लांबीची मलवाहीनी टाकणे व १०० द.ल.लि. मलप्रक्रिया केंद्र बांधणे व ५ वर्ष देखभाल व दुरुस्ती करणे या कामासाठी मे.एस.एम.एस.-विश्वा (जे.व्ही.) या ठेकेदारास फेब्रुवारी २००९ साली कार्यादेश देण्यात आला होता. ठेकेदाराने १८ महिन्यांचे आत उपरोक्त काम पूर्ण करणे अपेक्षित होते मात्र ठेकेदाराने सदरचे काम पूर्ण न केल्याने ठेकेदाराकडून काम काढुन घेऊन निविदा अटी नूसार ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे.

तसेच ठेकेदारास महापालिकेच्या इतर कामाच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास मज्जाव करण्यात आला आहे. ठेकेदाराने सोडून दिलेली सर्व कामे निविदा काढून इतर ठेकेदारामार्फत करुन घेण्यात येत आहेत.

ठाणे महानगरपालिकेने लोढा कॉम्प्लेक्स् येथे मलप्रक्रिया केंद्र बांधण्याचा निर्णय ऑक्टोंबर, २०१२ साली घेतला असून याकरिता निविदा काढून डिसेंबर २०१४ मध्ये कार्यादेश दिलेला आहे. उपरोक्त कामाचे सर्व डिझाईन व ड्रॉईंगचे काम पावसाळ्यापूर्वी अंतिम करुन मलप्रक्रिया केंद्राचे प्रत्यक्ष काम पावसाळ्यानंतर सुरु करण्यात आले आहे.

(२) व (३) उदंचन केंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी जानेवारी, २०१४ मध्ये निविदा मागविण्यात आल्या तथापि, ३ वेळा निविदा मागवूनही निविदेस पर्याप्त प्रतिसाद न मिळाल्यामुळे ऑगस्ट, २०१५ मध्ये पुन्हा चौथ्यांदा निविदा मागविण्यात आली.

सदर निविदा १९ सप्टेंबर, २०१५ रोजी उघडलेली असून निविदा अंतिम करण्याची कार्यवाही पुर्ण करुन दिनांक ०३.०५.२०१६ रोंजी कार्यादेश देण्यात आलेला असून काम सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या परिसरातील हद्दवाढीचा नवा प्रस्ताव**

**(१०) २३२३३ (११-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या परिसरातील २० गावांचा समावेश असलेला हद्दवाढीचा नवा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हद्दवाढीस परिसरातील गावांचा तीव्र विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हद्दवाढीबाबत शासनाची भुमिका काय व सदर हद्दवाढीच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**खंडाळा प्रशिक्षण केंद्राकडुन लोणावळा नगरपरिषदेच्या जागेवर होत असलेल्या अतिक्रमणाबाबत**

**(११) २४२४० (१२-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील (जि. पुणे) मुंबई-पुणे महामार्गालगत टीपी स्कीम क्र.१ सर्व्हे क्र.१७६अ/३ मध्ये लोणावळा नगरपालिकेचे जलतरण तलाव व पब्लिक पार्कसाठी आरक्षित असुन या जागेवर खंडाळा पोलीस प्रशिक्षण केंद्रातर्फे अतिक्रमण केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणावळा नगरपालिकेने याबाबत सातत्याने विचारणा करुनही पोलीस प्रशिक्षण केंद्राने दाद दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदेची मालकी असताना पोलीस प्रशिक्षण केंद्र सदर जमीन बळकावण्याचा प्रयत्न करीत आहे असा आरोप नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खंडाळा प्रशिक्षण केंद्राच्यावतीने लोणावळा नगरपरिषदेच्या जागेवर होणा-या अतिक्रमनाबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१), (२) व (३) सदर जागेचे सपाटीकरण करुन कवायतीसाठी वापर केला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधितांना नगरपरिषदेमार्फत जागेच्या मालकीविषयी अवगत करण्यात आले. सद्य:स्थितीत जागा नगरपरिषदेच्या ताब्यात आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा चारगांव (धरण) (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) हे पर्यटन स्थळ घोषित करण्याबाबत**

**(१२) २४७३२ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा चारगांव (धरण) (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) हे पर्यटन स्थळ घोषित करण्याबाबत मा.पर्यटन राज्यमंत्री यांनी व्यवस्थापकीय संचालक, पर्यटन यांच्याकडे योग्य ती कार्यवाही करण्याकरिता माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास सुचित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सूचनेनूसार व्यवस्थापकीय संचालक, पर्यटन यांनी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी याबाबत कार्यकारी अभियंता चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचेकडून मौजा चारगांव (धरण) ता.वरोरा, जि.चंद्रपूर हे पर्यटन स्थळ घोषित करणेबाबतचा अभिप्राय मागविले प्रस्ताव मागविला आहे.

---

**आर्णी नगर परिषद मध्ये कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१३) २५२५८ (११-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (आर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी नगर परिषदेची स्थापना दिनांक १६ ऑगस्ट, २०११ रोजी झाली असून आर्णी ग्रामपंचायतमध्ये ९३ कर्मचारी कार्यरत होते व नियमाप्रमाणे कार्यरत सर्व अस्थायी कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेच्या सेवेत सामावून घेणे क्रमप्राप्त असून सुध्दा ५३ कर्मचाऱ्यांना अद्यापही सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी नगरपरिषद अस्थायी कर्मचाऱ्यांचे समावेश करुन घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) नगर परिषद संचालनालयाच्या दिनांक २९/०५/२०१४ च्या आदेशान्वये आर्णी (जि.यवतमाळ) नगर परिषदेच्या आकृतिबंधानुसार ४० कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यात आले

आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या या नगर परिषदेच्या स्थापनेच्या प्राथमिक उद्योषनेनंतर करण्यात आल्या असल्याने त्यांचे समावेशन मंजूर आकृतिबंधात करण्यात आलेले नाही.

---

**ठाणे येथील मौजे-ढोकाळी, बाळकूम-ढोकाळी रोडवर, शैक्षणिक प्रयोजनाकरीता आरक्षित भूखंडावर अतिक्रमण केल्याबाबत**

**(१४) २५५९६ (११-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मौजे-ढोकाळी, बाळकूम-ढोकाळी रोडवर, सत्यवंदन सोसायटीचे बाजूस लागून असलेल्या शैक्षणिक प्रयोजना करीता आरक्षित भूखंडावर रस्त्याच्या पुढील बाजूस अतिक्रमण (अनधिकृत गाळे) झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडाच्या बाजूने गेलेल्या मलवाहिनीच्या गटारावर भर टाकून केलेल्या अतिक्रमणामुळे (अनधिकृत गाळे) सत्यवंदन सोसायटी व श्रृती पार्क सोसायटीच्या अंतर्गत मलवाहिन्या गोठून असलेल्या दुर्गंधीमुळे रहिवाश्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने सदर अतिक्रमण निष्कासित करणेबाबत आयुक्त. ठाणे महानगरपालिका दिनांक २७ जून, २०१३ रोजी वा त्या सुमारास सत्यवंदन सोसायटीने निवेदन दिलेले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या दिलेल्या निवेदनानुसार अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांस प्रत्यक्षपणे सहकार्य करणा-या जबाबदार अधिकाऱ्याविरुध्द व संबंधित अतिक्रमण निष्कासित करुन श्रृती पार्क व सत्यवंदन सोसायटीच्या चोकअप झालेल्या मलवाहिन्या सुरळीत होण्यासाठी शासन कोणती ठोस कारवाई करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर भूखंडाच्या बाजूस बांधण्यात आलेल्या अनधिकृत एकूण १३ गाळ्यांपैकी संपूर्ण गाळे तोडण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत सदर भूखंछावर कोणतेही अनधिकृत बांधकाम अस्तित्वात नाही.

(४) सद्यस्थितीत सत्यवंदन सोसायटीतील सांडपाणी वाहून जाण्यास कोणताही अडथळा नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील चोपडा नगरपरिषदेच्या लहान व मध्यम शहराची एकात्मिक शहर विकास योजनांचा (आयडीएसएमटी) सविस्तर प्रकल्पाबाबत**

**(१५) २५७३९ (१०-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील चोपडा नगरपरिषदेच्या लहान व मध्यम शहराची एकात्मिक शहर विकास योजनांचा (आयडीएसएमटी) सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेसाठी संचालक नगररचना यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग नवी-९ यांचेकडे दिनांक १७ मार्च, २०१० रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चोपडा नगरपरिषद हद्दीत विकास कामांचा मोठ्या प्रमाणात अनुशेष आहे व योजनेच्या खात्यात निधी शिल्लक असून देखील ४ वर्षात योजनेअंतर्गत समितीची बैठक न झाल्यामुळे मान्यतेअभावी शिल्लक निधीतून विकास कामे करता येत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, योजनेअंतर्गत समितीची बैठक तात्काळ घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :** (१) सहसंचालक नगररचना, पुणे यांनी दिनांक १०.०३.२०१० च्या पत्रान्वये सुधारित अहवाल राज्यस्तरीय समितीच्या मंजूरीसाठी शासनास सादर केलेला आहे.
(२) व (३) राज्य स्तरीय समितीची बैठक दिनांक ११.०३.२०१६ रोजी झाली आहे.
(४) कार्यवाही सुरु आहे.

---

**पंढरपूर (जि.सोलापुर) येथे राज्याच्या कानाकोपऱ्यातुन येणाऱ्या भाविकांसाठी बांधण्यात आलेल्या भक्त निवासाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याबाबत**

**(१६) २५८५४ (१०-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापुर) येथे राज्याच्या कानाकोपऱ्यातुन येणाऱ्या भाविकासाठी आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या भक्त निवासाचे काम अर्धवट अवस्थेत असल्यामुळे भक्त निवासाची अतिशय दुरवस्था झाली असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भक्त निवासाचे राहिलेले अधर्वट काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) भक्त निवासाचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) येथे नगर परिषदेच्या अंतर्गत "दारिद्रय रेषेखालील महिलांच्या कचरा बकेट वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१७) २६०३६ (११-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) येथे नगर परिषदेच्या अंतर्गत "दारिद्रय रेषेखालील महिलांच्या कचरा बकेट वाटपात गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारी व संबंधित समूह संघटिकेबाबत प्राप्त तक्रारी व त्यांच्या गैरवर्तुणुकीमुळे सौ.भोरगडे, समूह संघटिका, नगर परिषद दर्यापूर यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ३०/०५/२०१५ च्या आदेशानुसार सेवेतून कार्यमुक्त केले आहे.

---

**कन्हान शहरात (जि.नागपूर) पाणी पुरवठा करण्यात येणारे पाणी क्षारयुक्त असल्याचा अहवाल**

**(१८) २६२१५ (११-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान शहरात (जि.नागपूर) पाणी पुरवठा करण्यात येणारे पाणी क्षारयुक्त असून ते पिण्यायोग्य नसल्याचा अहवाल कन्हान नगरपरिषदेला प्राप्त झाल्यानंतरही दुषित पाणी पुरवठा होत असून याबाबत मुख्याधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची मागणी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक पदाधिका-यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) नरेश बर्वे व इतर शिवगर्जना विकास आघाडी, नगरपरिषद कन्हान पिंपरी यांच्याकडून दि. ०६/०५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अशा प्रकारचे निवेदन सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे प्राप्त झाले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी प्रश्न भाग १ मध्ये नमुद केलेले निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. या प्रकरणी विचाराधीन कालावधीन नमूद पाण्याचे नमूने शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत असलेल्या हायड्रोलॉजी प्रोजेक्ट विभाग, नागपूर येथील पाणी गुणवत्ता प्रयोगशाळा, स्तर २ नागपूर यांच्याकडून तपासण्यात आले

असून पाण्याचे नमूने पिण्यास अनुज्ञेय असलेल्या विहित मर्यादेमध्ये असल्याबाबतचा अहवाल प्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेस निधी मंजूर करुन योजना पूर्ण करण्याबाबत**

**(१९) २६२९४ (११-०८-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया शहराला वाढीव पाणी पुरवठा योजनेंतर्गत मुळ कार्यक्रमानुसार २३४ कि.मी. पाईप लाईन बसविण्याची योजना असतांना निधी अभावी केवळ १९७ कि.मी. इतक्याच पाइप लाईनचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण होण्याकरीता निधीची आवश्यकता आहे, तसेच गोंदिया नगरपरिषद आर्थिक दृष्या कमकुवत असल्याने सदरहू योजना पूर्ण करण्याकरिता केंद्र शासनाबरोबर राज्य शासन नगरपरिषदेस आर्थिक मदत देणार आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेकरीता आवश्यक त्या निधीची तरतूद करुन योजना पूर्णत्वास नेण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :** (१) गोंदिया शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत २३४ कि.मी. पैकी २०० कि.मी. पाईपलाईनचे कामे पूर्ण झाले आहे.

(२) व (३) गोंदिया शहराची सदर योजना ही केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत मंजूर असून मंजूर योजनेनुसार अनुज्ञेय केंद्र व राज्य हिश्याचा सर्व निधी यापूर्वीच वितरीत केला आहे. तद्नंतर सदर योजना व अनुषंगिक कामे करण्यासाठी शासनाने १३ व्या वित्त आयोगामधून रु. १८.०३ कोटीचा प्रस्ताव मंजूर केला असून रु. ६.०१ कोटीचा पहिला हप्ता जिल्हाधिकारी, गोंदिया मार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन दिला आहे.

---

**सर्व्हंट ऑफ इंडीया सोसायटीच्या जमिनी व जागा विकण्याची कार्यवाही कार्यकारी मंडळाकडून करण्यात येत असल्याबाबत**

**(२०) २६३५० (१०-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी स्थापन केलेल्या Servants of India Society च्या सुमारे १०० कोटी रुपये किंमतीच्या जमिनी व जागा विकण्याची कार्यवाही सोसायटीच्या सद्याच्या कार्यकारी मंडळाकडून करण्यात येत असल्याचे ॲड. सुनिल गोखले यांनी माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नामदार गोखले यांनी ज्या उदिष्टासाठी सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी मार्फत सर्वसामान्यांसाठी चालू केलेल्या उपक्रमाच्या जमिनी / जागा विकल्या जाऊ नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१६) :** (१) ॲड सुनिल गोखले यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. २० जुलै, २०१५ रोजी दिलेले निवेदन सह धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयास दिनांक ०८/०२/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे.
(२) सदर निवेदनाच्य अनुषंगाने सह धर्मादाय आयुक्त कार्यालय पुणे, यांचया कार्यालयातील निरीक्षकाकरवी चौकशी चालू आहे. सदरील चौकशीमध्ये न्यासाच्या गैरकारभाराबाबत तथ्य आढळून आल्यास उचित कार्यवाही केली जाईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपूर) रामपूर सिमेवरील नाला स्वच्छता रखडल्याबाबत**

**(२१) २६४१५ (११-०८-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि.चंद्रपूर) रामपूर सिमेवरील बारमाही वाहणारा नाला राजुरा नगरपरिषद व रामपूर ग्रामपंचायतच्या वादात स्वच्छता रखडली असल्याचे सतत निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वच्छतेसाठी निधी उपलब्ध असताना सिमावाद कारण दाखवून नाल्यातील इकोनिया वनस्पती व इतर गाळ स्वच्छ करण्यास मान्सुन पूर्व स्वच्छतेस दिरगांई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील आगमन करणा-या नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नाला स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही. मान्सून पूर्व तसेच वेळोवेळी इकोर्निया वनस्पतीमुळे निर्माण झालेला गाळ साफ करण्यात येतो.
(३) नाही.
(४) सदर नाल्यावर रिटेनिंग वॉल किंवा कॅनलचे काम करुन नाल्याजवळ १० मी.क्यु. चे जल निस्सारण प्रकल्प नगरपरिषद राजुरा यांच्याकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी शहरास (जि.कोल्हापूर) काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबविण्याबाबत**

**(२२) २८५३४ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे पंचगंगा व कृष्णा नदीचे पाणी प्रदुषित झाल्यामुळे इचलकरंजी शहरास काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवून पाणीपुरवठा करण्याबाबत प्रस्तावाचा अमृत योजनेत समावेश करून केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजनेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मंजुरी दिली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :** (१), (२), (३) व (४) इचलकरंजी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३.१०.२०१५ रोजी बैठक घेणेत आली. सदर बैठकीत पाणी पुरवठा प्रकल्पाची बाब, प्रकल्पाचे व्यवस्थापन याबाबतची व्यवहार्यता तपासून (काळम्मावाडी धरण उद्भव, वारणा नदी उद्भव, दुधगंगा नदी उद्भव) याबाबत व्यवहार्यता तपासून अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कमी खर्चाचा व देखभाल दुरुस्तीची दृष्टीने वारणा नदी (दानोळी) उद्भव किफायतशीर असल्याचा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि ०१.१२.२०१५ रोजी सादर केला आहे. इचलकरंजी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेचा समावेश अमृत योजनेमध्ये करणेबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली असून वारणा उद्भवत विचारात घेऊन पाणी पुरवठा प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**नाशिक जिल्हयातील येवले शहराला भुयारी गटारी योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानामधून निधी मंजुरीबाबत**

**(२३) २८५५७ (२१-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील येवले शहराला भुयारी गटारे योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानामधून निधी मंजुरीसाठी नगरपरिषदा प्रशासन संचालनालयाने दिनांक २६ जून २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव माहे ऑक्टोंबर, २०१५ पर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवले शहरासाठी भुयारी गटार योजनेच्या प्रस्तावास सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानामधून मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४)

- येवला नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्प केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी या योजनेअंतर्गत केंद्रशासनाकडे सादर करण्यात आला होता.
- तथापि सदर प्रकल्पास युआयडीएसएसमटी योजनेतून निधी उपलब्ध झाला नाही. केंद्र शासनाकडून निधी मिळण्यापूर्वीच नगरपरिषदने सदर कामाची निविदा काढून काम सुरु केले.
- आता सदर प्रकल्प सुवर्ण जयंती नथरोत्थान महाअभियानातून मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तो शासनाच्या विचाराधीन आहे.
- मात्र हा प्रकल्प नव्याने मंजूर करताना पुन्हा निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असून अगोदरच सुरु केलेल्या कामासाठी शासनाकडून निधी अनुज्ञेय राहणार नाही.

---

**बुलढाणा नगर परिषदेच्या हद्द वाढीबाबत**

**(२४) २८७६८ (२१-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा नगरपरिषदेची हद्द वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त बाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामध्ये कोणत्या ग्रामपंचायती समाविष्ट करण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, सदर हद्द वाढ प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१), (२), (३) व (४) मुख्याधिकारी, नगरपरिषद बुलढाणा यांनी नगरपरिषद बुलढाणा येथील हद्दवाढीबाबतचा प्रस्ताव तयार करुन दिनांक ३०/५/२०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी यांना पविला आहे. सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या शिफारशीसह शासनास अद्यापही प्राप्त झालेला नाही. उपरोक्त प्रस्तावाबाबत तातडीने

कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी बुलढाणा यांना शासन स्तरावरुन निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृत्रिम तलावात विसर्जित करण्यात आलेल्या गणेशमूर्ती पुन्हा समुद्रात सोडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२५) २८८३५ (२१-०१-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कृत्रिम तलावात विसर्जित करण्यात आलेल्या गणेशमूर्ती पालिका प्रशासनाने पुन्हा समुद्र व तलावात सोडल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण रक्षणाच्या नावाखाली तयार करण्यात आलेल्या ह्या कृत्रिम तलावावर महापालिकेने खर्च केलेले लाखो रुपये वाया गेल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :** (१) कृत्रिम तलावात विसर्जित करण्यात आलेल्या गणेशमुर्तीपैकी ज्या गणेशमूर्तीचे अविघटनशील अवशेष कृत्रिम तलावात विरघळले नाहीत अशा गणेशमुर्तींचे विसर्जन महानगरपालिका प्रशासनामार्फत समुद्राच्या पाण्यात विसर्जित करण्यात आले हे खरे आहे.

(२) कृत्रिम तलावांमुळे नागरीकांना त्यांच्या निवासस्थानापासून जवळच गणेशमुर्ती विसर्जनाची सुविधा प्राप्त झाल्याने, गणेश विसर्जनासाठी रहदारीतून नैसर्गिक विसर्जन स्थळाकडे जावे लागत नाही. परिणामी वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होऊन विसर्जनाच्यादिवशी मिरवणुकीचे विकेंद्रीकरण देखील होते.

गणेशमुर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन केल्यामुळे मुर्तीवरील रासायानिक रंगाचे व त्यातील विषारी द्रव्याचे विघटन कृत्रिम तलावातील पाण्यामध्ये होते. फक्त अविघटनशील अवशेषच समुद्राच्या पाण्यात सोडण्यात येत असल्यामुळे समुद्रातील प्रदुषणाचे प्रमाण कमी होत व रासायनिक/ विषारी रंगांमुळे होणारी जलचरांनी हानी टाळण्यास मदत होते.

त्यामुळे महानगरपालिकेने कृत्रिम तलावावर केलेला खर्च वाया गेला असे म्हणणे योग्य होणार नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूर बाजार नगरपरिषदेच्या (जिल्हा अमरावती) मुख्याधिकारी यांचा अनियमित कारभार आणि गैरव्यवहार याची चौकशीबाबत**

**(२६) २८९०१ (२१-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर बाजार नगरपरिषदेच्या (जिल्हा अमरावती) मुख्याधिकारी मेघना वासणकर यांच्या अनियमित कारभार आणि गैरव्यवहार याची चौकशी करून त्यांनी शासकीय कर्तव्यात कसूर केल्यामुळे निर्माण होणारी कायदा आणि सुव्यवस्थेची गंभीर स्थिती पाहता त्यांचेवर शिस्त भंगाची कारवाई करणे बाबत स्थानिक विधानसभा सदस्य यांनी दिनांक २५/८/२०१५ रोजी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने संबंधित मुख्याधिकारी यांची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) चांदूर बाजार नगरपरिषदेच्या (जि.अमरावती) मुख्याधिकारी, नगरपरिषद चांदूर बाजार श्रीमती मेघना वासनकर यांची बदली मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगाव येथे करण्यात आली आहे व त्यांना दि. २१/०८/२०१५ रोजी कार्यमुक्त करण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करणेबाबत**

**(२७) २९०४६ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पाणी, गड-किल्ले, तीर्थक्षेत्रे आणि हिरवाईचा विचार करता कोल्हापूर पर्यटनासाठी पोषक जिल्हा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटनासोबत कृषी पर्यटनालाही चालना दिल्याने स्थानिक लोकांना चांगला रोजगार मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) पर्यटन जिल्हे घोषित करण्यासाठी निकष निश्चित करण्याची बाब विचाराधीन आहे.

---

**खामगाव जि. बुलढाणा येथील नगर परिषदे अंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(२८) २९१६७ (२१-०१-२०१६). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलढाणा) येथील नगरपरिषदे अंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्यामुळे ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हस्तांतरणाची कार्यवाही करून सदर योजनेचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :** (१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी उपभियानांतर्गत मंजूर खामगांव नगरपरिषेदच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी उर्वरित कामकाजाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करण्याबाबत सूचना खामगांव नगरपरिषदेस देण्यात आल्या आहेत.

---

**वडाळा (मुंबई) येथील अॅक्वर्थ कुष्ठरोग रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दोन रुग्णांचा झालेला मृत्यू**

**(२९) २९२५३ (२१-०१-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा (मुंबई) येथील अॅक्वर्थ कुष्ठरोग रुग्णालयातील दोन कुष्ठरोग्याचा मृत्यू मुंबई मनपा प्रशासनाच्या अनास्थेमुळे व कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कुष्ठरोग रुग्णालयात काही कुष्ठरोगी किमान २५ ते ५० वर्षे खितपत पडले असून कर्मचारी शनिवार व रविवारी या दिवशी सुटीवर असल्याने रुग्णांना आवश्यक असलेले सलाईन दिले जात नसल्याने या दोन कुष्ठरोग्याचा मृत्यू झाला आहे तसेच रुग्णालयात ढेकणाचा सुळसुळा झाला असून त्यांचा त्रासही रुग्णांना होत आहे तसेच रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांना लवकर घरी जायचे असल्याने या कुष्ठरोग्यांना दुपारचे जेवण सकाळी १० वा व रात्रीचे जेवण दुपारी ४ वा मिळते तसेच इतरही काही गोष्टीमुळे कुष्ठरोग्यांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) ॲक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालयात वास्तव्यास असणाऱ्या रुग्णांपैकी दि.१ जानेवारी, २०१५ ते ३१ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत ३ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. यापैकी दाने रुग्णांचा मृत्यू वयोवृध्द असल्याने, वयाबरोबर येणाऱ्या इतर आजारांमुळे झालेला आहे व एका रुग्णाचा मृत्यू यकृताच्या आजारामुळे झाला आहे.

त्यामुळे कोणत्याही रुग्णाचा मृत्यू महापालिका प्रशासनाच्या अनास्थेमुळे वा कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

ॲक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालयात असलेले कुष्ठरुग्ण पुर्णपणे बरे होऊनही केवळ सामाजिक प्रश्नामुळे व परिवाराच्या अनास्थेमुळे रुग्णालयातच वयोवृध्द होऊन जीवन व्यतीत करत आहेत.

सदर रुग्णालयात कुष्ठरोगमुक्त व्यक्ती कायमस्वरुपी वास्तव्यास असल्यामुळे त्यांना योग्य त्या सोयीसुविधा पुरविण्यात येत आहेत. तसेच महापालिकेच्या किटकनाशक विभागाद्वारे सर्व रुग्ण कक्षांमध्ये धुम्रफवारणी, ढेकणांसाठी रसायन फवरणी तसेच विविध उपाय नियमितपणे केले जातात.

रुग्णांना सकस आहार मिळावा म्हणून नियमितपणे रुग्णालयातील स्वयंपाकगृहातून जेवण पुरविण्यात येते. यामध्ये सकाळी ६.३० वा. चहा, ब्रेड, दूध तसेच दुपारी ११.३० वा जेवण व अंडी, दुपारी २.४५ वा. चहा व संध्याकाळी ६.३० नंतर जेवण देण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कांजूर व्हिलेज, कांजूर मार्ग (पूर्व) येथील जमिनीचा विकास करतांना आरएनए विकासकास भूखंडावरील झाडे कापण्यास परवानगी दिल्याबाबत

**(३०) २९५३२ (२१-०१-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप विधानसभा क्षेत्रातील कांजूर व्हिलेज, कांजूर मार्ग (पूर्व) येथील सीटीएमए नं.१०१६/५ ते ०११६/३ ते ४ या जमिनीचा विकास करतांना आरएनए विकासकास भूखंडावरील ७५ झाडे कापण्यास व १५१ झाडे ट्रान्सप्लाँट करण्यास शासनाच्या वृक्ष प्राधिकरणाने परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरएनए विकासकाने सर्वच्या सर्व ७५ झाडे कापून टाकूण १५१ झाडांचे ट्रान्सप्लाँट केले नसल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या समन्वेत मुंबई महानगरपालिका प्रभाग समिती एस व टी विभाग अध्यक्ष व संबंधित अधिकाऱ्यांसोबत दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी पाहणी केली असतांना विकासकाने पर्यावरणानाचा नाश केल्याचे आढळून आल्यानंतर आरएनए विकासक व विकासकास नियमबाह्य सहकार्य करणाऱ्या वृक्ष प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर सीआर दाखल करुन गुन्हा नोंदवावा अशी मागणी करणारे निवेदन दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी लोकप्रतिनिधींने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :** (१) आर.एन.ए. विकासकास परवानगी दिली हे खरे नाही.

तथापि, कांजूर क्रॉम्पटन नाल्याच्या विस्तारीकरणाचा काही भाग सीटीएस क्र. १०१६/५ ते १०१६/३ ते ४ मधून जातो. यासंपूर्ण नाल्याच्या प्रस्तावित विस्तारीकरणासाठी बृहनमुंबई महानगपालिकेच्या उप प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिनी) पूर्व उपनगरे या खात्यास ७५ झाडे कापण्यास व १५१ झाडे पुनर्रोपित करण्यास वृक्ष प्राधिकरणामार्फत परवानगी देण्यात आली होती.

(२) व (३) होय, अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन प्राप्त झाले होते हे खरे आहे.

तथापि, सदर ठिकाणी झाडे कापण्यास अथवा पुनर्रोपित करण्यास आर.एन.ए. विकासकास परवानगी देण्यात आलेली नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील विठ्ठलवाडी ते वारजे दरम्यानच्या नदी पात्रातील रस्ता कायम ठेवण्याबाबत**

**(३१) २९९१४ (२१-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील विठ्ठलवाडी ते वारजे दरम्यानच्या नदी पात्रातील रस्ता उखडून काढण्यास स्थानिक नागरिकांनी जोरदार विरोध केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे ओह काय,

(२) असल्यास, हा रस्ता काढल्याने वारजे पुलाच्या बाजूकडील सोसायट्यांना येजा करण्यासाठी रस्ताच उरणार नाही तसेच अनेक सोसायट्या थेट नदीपात्रात येतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता कायम ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वारजे पुलाच्या बाजूकडील सोसायट्यासमोरील भागामध्ये ब्ल्यू लाईन निश्चित करण्याची कार्यवाही पुणे पाटबंधारे विभागामार्फत सुरु आहे. प्रत्यक्ष जागेवर ब्ल्यू लाईन आखल्यानंतर, या सोसायट्यांना ये-जा करण्यासाठी रस्ता शिल्लक राहत नसल्याची बाब निदर्शनास आल्यास, या सोसायट्यांकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध करुन दिल्यानंतर, सदर सोसायट्यांसमोरील रस्त्याचा ब्ल्यू लाईनच्या आतील येणारा भाग राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशानुसार काढण्यात येणार आहे.

सदर ठिकाणी संरक्षक भिंत बांधून रस्ता केला असल्याने रस्ता व संरक्षक भिंत काढल्यानंतर काही मिळकतीमध्ये पुराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे.

(३) सदर रस्ता मुळा-मुठा नदीपात्राच्या ब्ल्यु लाईनच्या आत येत असल्याबाबतची तक्रार जनहित याचिकेद्वारे मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्याकडे दाखल झाली. त्यावर मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी सदरचा नदीपात्रातील रस्ता काढण्याबाबत दिनांक १४.१.२०१५ रोजी आदेश दिले. त्यावर पुणे महानगरपालिकेमार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलावर मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचा निर्णय कायम ठेवल्याने सदरचा रस्ता काढणे अनिवार्य असून रस्त्याचे बांधकाम काढण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वरळी, प्रभादेवी, लोअरपरेल, एलफिन्स्टनचा संपूर्ण परिसरात डेंग्यु मलेरीया सारखे साथीचे आजार पसरल्याबाबत**

**(३२) ३००९४ (२१-०१-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी, प्रभादेवी, लोअरपरेल, एलफिन्स्टनचा संपूर्ण परिसर असलेला जी दक्षिण प्रभागात डासांच्या प्रादुर्भावाने डेंग्यु मलेरीया सारख्या साथीच्या आजारांनी नागरिक ग्रासले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील मोठ्या प्लॉटवर सुरु असलेल्या एका इमारतीच्या बांधकामाच्या साईटवर १८ ठिकाणी डासांची पैदास आढळली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे महानगरपालिकेच्या वार्ड कार्यालयाने विकासकाला स्टॉपवर्कची नोटीस बजावली व ती दोनच दिवसात मागे घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासकाला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली आहे तसेच सदर परिसरात साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागातील एका इमारतीच्या बांधकामाच्या साईटवर १४ ठिकाणी डासांची पैदास आढळली होती.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १०.०७.२०१५ रोजी विकासकास स्टॉप वर्क नोटीस बजावली होती. तथापि, स्टॉप वर्क नोटीसमध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता विकासकाने केल्यानंतर महानगरपालिकेने सदर नोटीस दिनांक १५.७.२०१५ रोजी मागे घेतली.

(४) विकासकास अधिकाऱ्यांनी कोणतीही सूट दिलेली नसल्याने अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी योजनेसाठी निवड केलेल्या महानगरपालिकाच्या रुग्णालयात रुग्णांना पुरेशा प्रमाणात उपचार मिळत नसल्याबाबत**

**(३३) ३०२१४ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात राजीव गांधी योजनेसाठी १८ रुग्णालयाची निवड केली असता त्यापैकी केवळ १० रुग्णालये पात्र झाल्याने रुग्णांना पुरेशा प्रमाणात उपचार मिळत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निवड केलेली सर्व रुग्णालये सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रा.ए.स्मा.रुग्णालय, लो.टि.म.स. रुग्णालय व नायर रुग्णालय येथे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनाकार्यान्वित आहे.

महापालिकेच्या ५ विशेष रुग्णालयापैकी कस्तुरबा रुग्णालयाची राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्यासाठी निवड झालेली आहे.

कस्तुरबा रुग्णालयात जून, २०१३ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्यात आलेली आहे.

तसेच महापालिकेच्या खालील उपनगरीय रुग्णालयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वित आहे :-

- खुरशीदजी बेहरामजी भाभा रुग्णालय, वांद्रे
- विष्णुप्रसाद नंदराय देसाई रुग्णालय, सांताक्रुझ
- मनोहर वामन देसाई रुग्णालय, मालाड (पूर्व)
- हरीलालह भगवती रुग्णालय, बोरीवली (प.)
- खान बहादूर भाभा रुग्णालय, कुर्ला
- पंडीत मदनमोहन मालवीय रुग्णालय, गोवंडी
- शेठ वाडीलाल छत्रभुज गांधी व मोनजी अभिदास व्होरा म.न.पा. रुग्णालय राजावाडी, घाटकोपर (पूर्व)

- स्वातंत्र्यवीर सावरकर रुग्णालय, मुलुंड (पूर्व)
- मनसादेवी तुलसीदास अगरवाल रुग्णालय, मुलुंड (पश्चिम)
- डॉ.रुस्तुम नरसी कुपर रुग्णालय, विलेपार्ले (पश्चिम)

या रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरळीतपणे चालू असून या योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील लाभार्थी रुग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार करण्यात येतात.

तसेच, महापालिकेच्या सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगांव व क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय, विक्रोळी या दोन उपनगरीय रुग्णालयांमध्ये जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अग्निशमन यंत्राणा नवीन बसविण्याबाबत**

**(३४) ३०४०८ (२१-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या काही शाळांमधील अग्निशमन यंत्राची मुदत संपुष्टात आली असुनही महानगरपालिकेचा शिक्षण विभाग आणि मुख्याध्यापकाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन संबंधित प्रशासनाने महानगरपालिका शाळांमध्ये अग्निशमन यंत्रे बसविण्याचा निर्णय घेतला त्या अनुषंगाने कार्यवाही केली परंतू तदनंतर या यंत्राची मुदत संपल्यानंतर माहे जानेवारी, २०१४ मध्ये पुनर्भरण करण्यात आले परंतू काही महानगरपालिका शाळांमधील यंत्राची मुदत जानेवारी आणि माहे जून, २०१५ मध्ये संपुष्टात आली असूनही त्यांचे पुनर्भरण व बदलणे आवश्यक असुनही ते करण्यात येत नसल्याने विद्यार्थ्यांच जीवन धोक्यात आले आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २००६-०७ मध्ये ४९२ शाळांमध्ये ३५८७ अग्निशमन यंत्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आली.

बृहन्मुंबई महानगपालिकेच्या शाळांमधील अग्निशमन यंत्राची पुनर्भरणी सन २०१३-१४ मध्ये आवश्यकतेनुसार करण्यात आली.

सन २०१५-१६ मध्ये २००० नवीन अग्निशमन यंत्रे खरेदी करण्याची तसेच अग्निशमन यंत्राची पुनर्भरणीबाबतची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात न येण्याबाबत संपूर्ण दक्षता महानगरपालिकेमार्फत घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे परिसरातील खाडी किनाऱ्याचा विकास करण्याबाबत**

**(३५) ३०८६२ (२१-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त, ठाणे महापालिका यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे परिसरातील खाडी किनाऱ्याचा विकास करण्याचा दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठकीत निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३२ कि.मी. लांबीच्या खाडीकिनाऱ्याचे सुशोभिकरण व संवर्धन - वॉटर फ्रंटर डेव्हलपमेंट मास्टर प्लॅन पैकी सिडको बस स्टॉप ते साकेत पर्यंतच्या ३.४ कि.मी. लांबीच्या एका भागाच्या प्रकल्पास राज्य शासनाच्या महाराष्ट्र कौस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरीटीने दिनांक २९.०५.२०१४ ते दिनांक ३१.०५.२०१४ या कालावधीत झालेल्या बैठकीत अटी व शर्तीस अधीन राहून पर्यावरण परवानगी दिली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्तावाचा समावेश स्मार्ट सिटी अभियानात करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील हरी निवास सर्कल येथे आजीकृपा या धोकादायक इमारतीला पालिका अधिकाऱ्यांनी सील केल्याबाबत**

**(३६) ३०९४९ (२१-०१-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या हरी निवास सर्कल येथे आजीकृपा या चार मजली धोकादायक इमारतीला पालिका अधिका-यांनी सील ठोकले आहे त्यामुळे तेथे राहण्याऱ्या ५७ मराठी कुटूंबियांनी तातडीने स्वतःची घरे रिकामी केली असून ते सर्वजण आता बेघर झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेघर कुटूंबांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

आजीकृपा ही चार मजली धोकादायक इमारत निष्कासित करण्यात आली.

(२) ठाणे महानगरपालिका हद्दीतील अतिधोकादायक इमारती तोडण्याची कार्यवाही करण्यात आली असून सदर अतिधोकादायक इमारतीमधील ज्या रहिवाशांकडे राहण्यासाठी स्वतःची पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही, अशा रहिवाशांना तात्पूरत्या स्वरुपात शासनाने दिलेल्या निर्देशानुसार दोस्ती कॉर्पोरेशन प्रा.लि. यांचेमार्फत रेंटल हऊसिंग स्कीम अंतर्गत वर्तकनगर येथे बांधण्यात आलेल्या दोस्ती विहारमधील सदनिकांमध्ये भाडेतत्वावर राहण्यासाठी घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

कोणत्याही कुटुंबांना बेघर करण्यात आलेले नाही. तथापि, तेथील काही रहिवाशांनी सक्षम घरांची पाहणी करुन घरे पसंत नसल्याचे सांगितले व पर्यायी व्यवस्था स्विकारण्यास नकार दिला व अन्य ठिकाणी घरे उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केली आहे.

काही रहिवाशी सद्यस्थितीत महापालिकेच्या पर्यायी व्यवस्थेत राहत आहेत. धोकादायक/अतिधोकादायक इमारतीमधील रहिवाशांना त्यांचे सामान हलविण्यासाठी महानगरपालिकेकडून मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करुन देण्यात आलेली आहे.

ठाणे शहरातील धोकादायक तसेच अतिधोकादायक कोसळून जीवित व वित्त हानी होण्याच्या घटना घडत असल्याने महानगरपालिकेकडून शहरातील धोकादायक/अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीसंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व मार्गदर्शक सुचना तयार केल्या असून सदर कार्यपध्दती व मार्गदर्शक सुचनांनुसार ठाणे महानगरपालिका हद्दीतील धोकादायक व अतिधोकादायक इतारतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिका शाळांच्या दुरवस्थेबाबत

**(३७) ३१०१६ (२३-१२-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका शाळांच्या दुरावस्थेचा प्रश्न बिकट असतानाही एमएमआरडीए रेल्वे, विमानतळ अशा विविध प्राधिकरणांनी अद्याप पुर्नविकासाच्या प्रस्तावास (ना हरकत) न दिल्याने १० शाळांचा पुनर्विकास प्रस्ताव गत अनेक वर्षापासून रखडला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अनेक शाळा या विविध प्राधिकरणांच्या जागेवर असुन यापैकी अनेक शाळांची अवस्था ही बिकट असल्याने त्या शाळांचा पुनर्विकास करणे अत्यंत

गरजेचे आहे परंतू या प्रस्तावांना मान्यता मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात आले आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर शाळांच्या बाबतीत महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

- सदर शाळेच्या इमारतीच संरचनात्मक परीक्षण करुन त्याप्रमाणे इमारतीचे वर्गीकरण करुन त्यानुसार इमारतीबाबत किरकोळ दुरुस्ती, संरचनात्मक दुरुस्ती / पुनर्विकास इत्यादी कार्यवाही महापालिकेमार्फत करण्यात येते.
- एखाद्या शाळेची इमारत अत्यंत दुरावस्थेत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे तात्काळ स्थलांतर करुन इमारत निष्कासित करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्यात येते.
- सदर शाळा निष्कासित केल्यानंतर पुनर्विकासाकरिता प्रस्ताव पाठविण्यासंबंधी विविध प्राधिकरणांशी महापालिकेमार्फत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात ई-कच-याची विल्हेवाट लावणारी यंत्रणा नसल्याबाबत**

**(३८) ३१४५६ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई या स्मार्ट सिटी होवू इच्छिणाऱ्या शहरात दररोज दहा हजार मेट्रिक टन कचरा गोळा होत असून ई-कच-याची विल्हेवाट लावणारी यंत्रणा नसल्याने या कचऱ्यात ई-कच-याचे वर्गीकरण न होता नियमित कच-यामध्येच जात असल्याची माहिती ९० टक्के मुंबईकरांना नसल्यामुळे ई-कच-याबाबत जनजागृतीची आवश्यकता असल्याची बाब दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या दरम्यान सेंट झेवियर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत जनजागृती करण्यासाठी काही उपाययोजना आखलेली आहे काय, असल्यास, त्याचा तपशिल काय,
(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या दरम्यान सेंट झेविअर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या संदर्भान्वये लिखीत स्वरुपात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागाकडे कोणतीही माहिती आलेली नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे गोळा करण्यात येणाऱ्या तसेच क्षेपणभूमीवर वाहून नेण्यात येणाऱ्या घन करचाऱ्यामध्ये ई.कचऱ्याचे प्रमाण नगण्य आहे. कारण सार्वजनिक कचरा कुंडीवर तसेच कचरा गाडीस कचरा देण्यापूर्वीच नागरिकांकडून तसेच कचरा वेचकांकडून या कचऱ्यांची विल्हेवाट, स्थानिक भंगार विक्रेत्यांकडे लावली जाते.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे २४ विभागात ई-कचरा संकलन केंद्रे उभारण्याचे प्रस्ताविले आहे. अशा प्रकारचे पहिले ई-कचरा संकलन केंद्र दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागत सफलतापूर्वक कार्यान्वित करण्यात आले आहे.

ई-कचरा संकलन केंद्र सुरु केल्यानंतर ई-कचऱ्याबद्दल जनजागृती करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुका कचरा वाहनांवर ई-कचरा संकलन केंद्राबद्दल फलक लावण्यात आले आहेत. विविध वृत्तपत्र आणि वृत्तवाहिन्यांमार्फत ई-कचऱ्याबद्दल जनजागृती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहाच्या जागेवर सर्वसाधारण रुग्णालय चालवणाऱ्या आठ रुग्णालयांना महानगरपालिकेने नोटीसा दिल्याबाबत**

**(३९) ३१५९३ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहाच्या जागेवर प्रसूतीगृह चालविण्याऐवजी सर्वसाधारण रुग्णालय चालवणाऱ्या आठ रुग्णालयांना माहानगरपालिकेने नोटीसा दिल्याने या रुग्णालयातील सातशे कर्मचारी बेकारीच्या छायेत असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात सर्वसामान्य जनतेला अत्यंत अल्पदरात सर्व सोयीसुविधा देण्यात येत असल्याने महानगरपालिकेने या नोटीसा मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत महानगरपालिका प्रसुतीगृहे चालविण्यासाठी दिलेल्या १६ संस्थापैकी ९ संस्थांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेबरोबर केलेल्या करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे, त्या संस्थांना नोटीसा दिल्या आहेत.

(२) सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत, बृहनमुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत उपरोक्त सर्व संस्थांना प्रसुतिगृहे / प्रसुतिगृहे व दवाखाना असे ना नफा ना तोटा या तत्वावर सुधार समिती / महापालिका ठराव करुनच त्या अटी व शर्तीसापेक्षा प्रसुतिगृहे / प्रसुतिगृहे व दवाखाना १०/३० वर्षाच्या कालावधीकरिता चालविण्यास दिल्या आहेत. सदर संस्थांनी करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे तसेच कारणे दाखवा नोटीस देवूनही त्यात सुधारणा न केल्यामुळे करार रद्द करण्याच्या नोटिस देण्यात आल्या आहेत. दरम्यानच्या काळात, महानगरपालिकेने सार्वजनिक खाजगी सेवा प्रोत्साहन धोरणांतर्गत प्रसुतिगृहे / दवाखाना चालविण्यासाठी देण्यात आलेल्या संस्थेनी प्रसुतिगृहाव्यतिरिक्त इतरही सेवा पुरविल्यामुळे श्री. संतोष चिकणे यांनी या संस्थेविरुध्द न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

या याचिकेअंतर्गत मा.उच्च न्यायालयाने महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यातर्फे सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत ज्या ज्या संस्थांना काळजीवाहू तत्वावर प्रसुतिगृहे किंवा दवाखाना चालविण्याकरिता जागा दिलेल्या आहेत व ज्या संस्थांनी अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे अश्या सर्व संस्थाविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बजाविण्यात आलेल्या नोटीसा मागे घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी दूषित पाण्यावर प्रक्रिया करून पाणी वापरण्यायोग्य करण्याकरिता बडोदा पॅटर्न औरंगाबाद शहरात राबविण्याबाबत**

**(४०) ३३१७३ (२१-१२-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी दूषित पाण्यावर प्रक्रिया करून पाणी वापरण्यायोग्य करण्याकरिता बडोदा पॅटर्न औरंगाबाद शहरात राबविण्याचाविचार शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील दुष्काळसदृश वा दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सामना करण्याच्या दृष्टीने सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पिण्या व्यतिरिक्तच्या कामासाठी वापरण्याविषयी राज्य जलस्त्रोत नियामक प्राधिकरणाने केलेल्या शिफारशीवर अंमलबजावणी करण्याबाबत विचार करण्याचे आदेश न्यायालयाने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :** (१), (२), (३) व (४) औरंगाबाद शहरात बडोदा पॅटर्न राबविण्याची कोणतीही बाब शासनच्या विचाराधीन नाही.

तथापि, श्री.राजेश एम. पंडीत व इतर यांनी नाशिक महानगरपालिके विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१७६/२०१२ च्या न्यायालयीन प्रकरणामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी पिण्याच्या व्यतिरिक्तच्या औद्योगिक कामासाठी वापरण्याविषयी नीरी, नागपूर यांनी केलेल्या शिफारशींवर अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश मा.उच्च न्यायलय, मुंबई यांनी दिले होते.

गोदावरी नदीच्या प्रदुषण नियंत्रणासाठी उपाययोजना सुचविण्याबाबत नीरी, नागपूर यांनी सुचविलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रणाबाबतचे धोरण तयार करण्याची कार्यवाही जलसंपदा विभागांतर्गत सुरु आहे.

---

**नागपूर शहरातील भांडेवाडी येथील दुषित पाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्याचा प्रकल्प**

**(४१) ३४९६८ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात केंद्र सरकाराच्या जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत महापालिकेने महाजनकोच्या सहकार्याने भांडेवाडी येथे दुषित पाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्याच्या प्रकल्पाच्या कामाला गती येण्यासाठी महाजनकोला १० कोटीची निधी देण्याचा निर्णय महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरालगतच्या ३१ गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत करण्याचा प्रस्ताव**

**(४२) ३६०४९ (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरालगतच्या ३१ गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे पाठविलेला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरालगत असलेल्या गावातील ग्रामपंचायतीना कर जमा करण्यात येत नसल्याने या गावातील विकास कामांवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) पुणे शहरालगतच्या ३४ गवांचा समावेश पुणे महानगरपालिकेत करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे पाठविलेला असून, तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ६०/२००१ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत हद्दीतील इमारतींवर कर आकारणीस दिनांक ६ एप्रिल, २०१५ च्या शासन परित्रकान्वये स्थगिती देण्यात आली होती. मात्र, इतर कर आकारणीस स्थगिती देण्यात आली नव्हती.

दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी ग्रामपंचायतहद्दीतील इमारतींवर भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्याबाबतची अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली असून, दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्तांवर कर आकारणीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ च्या अधिसूचनेनुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींच्या विकास कामांवर परिणाम झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा, पुणे येथील अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाचे काम अर्धवट असल्याबाबत**

**(४३) ३७९०० (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा, पुणे येथील अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाचे काम अर्धवट असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नाट्यगृहाचे काम अर्धवट असण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या नाट्यगृहाचे कामासाठी महानगरपालिकेने आतापर्यंत किती रक्कम खर्च केलेली आहे,

(४) असल्यास, अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) व (२) उपलब्ध तरतुदीप्रमाणे सन २०१०-११ पासून सदर नाट्यगृहाचे काम सुरु असून, सद्य:स्थितीत ९०% सिव्हील काम पूर्ण झालेले आहे. सन २०१६-१७ च्या तरतुदीमधून उर्वरित सिव्हील कामे, अंतर्गत सुशोभिकरण, ॲकॉस्टीक, फर्निचर व विद्युत विषयक कामे करुन नाट्यगृहाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

(३) सदर जागेवर उभारण्यात आलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाच्या कामासाठी महानगरपालिकेने (विद्युत कामासहित) आज पर्यंत रुपये ९५०.०० लक्ष लतके खर्च केलेले आहेत.

(४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात नाट्यगृहाचे काम पूर्ण करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील विकासाचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ३८४८९ (१४-०१-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील पंचगंगा, प्रदुषण, सुजल अभियान, दुधाळी व कसबा बावडा सांडपाणी प्रक्रिया केंद, थेट पाईपलाईन, नगरोत्थान रस्ते प्रकल्प, रंकाळा सुशोभिकरण, पावसाळी पाणी नियोजन आदी शहरातील कामांसाठी २००८ पासून ते आजपर्यंत तब्बल ७३७ कोटी ९१ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे व त्यामध्ये कोणकोणती कामे करण्यात आली आहे तसेच उर्वरित कामांकरिता कामे करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प मार्गी लावण्याकरिता कोणत्या कंपनीकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती व सदर काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित होते,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्प दिलेल्या वेळेत पूर्ण न करणाऱ्या उक्त कंपनीवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :** (१) कोल्हापूर शहरातील पंचगंगा प्रदूषण, महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत सांडपाणी प्रक्रिया, केंद्र शासन पुरस्कृत युआडीएसएसएमटी अंतर्गत थेट पाईपलाईन योजना, राष्ट्रीय सरोवर संवर्धन अंतर्गत रंकाळा तलाव संवर्धन, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत रस्ते प्रकल्प व पावसाळी पाणी नियोजन या सात प्रकल्पासाठी आतापर्यंत रु.३४७.७७ कोटी निधी कोल्हापूर महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला आहे.

(२) सदर सात प्रकल्पांसाठी वितरीत केलेल्या रु.३४७.७७ कोटी निधी पैकी २१५.५९ कोटी खर्च झाला. असून प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) सदर सात प्रकल्पांसाठी निविदा प्रक्रिया राबवून त्यानुसार पात्र कंत्राटदारास कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर ७ कामांपैकी ४ कामांचा कालावधी २ वर्षे १ कामाचा कालावधी तीन वर्षे आहे. तर उर्वरीत दोन कामांचा कालावधी अनुक्रमे १८ व २१ महिने आहे.

(४) व (५) कामांमध्ये विलंब करणाऱ्या ठेकेदार कंपन्यांवर निविदा अटी व शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.

---

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने केलेला गैरव्यवहार**

**(४५) ३८५४८ (२०-०१-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ३०६७ मंदिराचे व्यवस्थापन पाहाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने केलेल्या गैरव्यवहाराची राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाच्या वतीने चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशीला प्रारंभ झाला आहे काय, असल्यास, सदर चौकशीचे नेतृत्व कोणाकडे देण्यात आले असून त्यांना किती प्रमाणात अधिकारी-कर्मचारी वर्ग, तसेच साधन सुविधा देण्यात आलेली आहे,
(३) सदर गैरव्यवहाराची प्रचंड मोठी व्याप्ती पाहता चौकशी दरम्यान पुरावे नष्ट केले जाऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) सदर गैरव्यवहाराची चौकशी कधीपर्यंत पूर्ण होणार आहे, तसेच चौकशी अहवाल शासनाकडे कधीपर्यंत प्राप्त होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
शासन गृह विभागाकडील पत्र क्र. सीआयडी ०४१५/प्र.क्र.१७८/पोल-१२ दि.२२.४.२०१५ अन्वये राज्य गुन्हा अन्वेषण विभाग (गुन्हे पश्चिम) परिक्षेत्र कोल्हापूर यांच्यामार्फत दि.२२.५.२०१५ पासून चौकशी सुरु आहे.
चौकशीचे कामकाज विशेष पोलीस महानिरिक्षक, रा.गु.अ.वि. कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून, सदर चौकशीचे नेतृत्व डॉ.दिपाली काळे, अपर पोलीस अधीक्षक, गु.अ.वि. कोल्हापूर परिक्षेत्र करीत आहेत. त्यांच्या मदतीस श्री.डी.डी.कांबळे, पोलीस उप अधीक्षक, गु.अ.वि. कोल्हापूर परिक्षेत्र व एक कर्मचारी देण्यात आले आहेत. तसेच साधन सामुग्री मध्ये चौकशीकरीता अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडील शासकीय वाहनाचा वापर केला जात आहे.
(३) सदर प्रकरणातील पुरावे नष्ट केले जाऊ नयेत म्हणून अत्यावश्यक दस्तऐवजांच्या साक्षांकीत प्रती संबंधित कार्यालयाकडून तात्काळ प्राप्त करुन घेतल्या आहेत.
(४) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महारष्ट्र, कोल्हापूर या समितीची स्थापना १९६९ मध्ये झाली असून, तेव्हापासूनची चौकशी राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडून सुरु आहे. तसेच समितीच्या अधिपत्याखालील ३०६७ देवस्थांनाची किती जमीन आहे व त्याबाबतची सद्य:स्थितीच्या पडताळणी करण्याच्या कामाची व्याप्ती मोठी आहे. सर्व मंदिरांच्या दागदागीन्यांच्या मुल्यांकनाचे काम सुरु आहे. चौकशीमध्ये कोणतीही दिरंगाई होत नसून प्राधान्याने काम सुरु आहे. चौकशीची व्याप्ती मोठी असून चौकशी पूर्ण झाल्यानंतर प्राप्त अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

---

**मौजे लाडघड (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावास पर्यटन स्थळांचा विशेष दर्जा देण्याबाबत**

**(४६) ३८६८२ (२१-०१-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाडघड (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावास पर्यटन स्थळाचा विशेष दर्जा देण्याची मागणी शासनाकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केल्याचे निदर्शनास आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सदर गावास दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यास येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) दि.२४/११/२०१५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये सदरहू प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात आला होता. तथापि, पर्यटन स्थळ जाहिर करताना प्रस्तावित स्थळ, पुरातन, ऐतिहासिक, निसर्गरम्य, भव्य, कलात्मक म्हणून सर्व धार्मियांसाठी आकर्षक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होण्याच्या शक्यतेचा विचार करुन त्यानुसार प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे मौजे लाडघर या गावास "क" वर्ग पर्यटनस्थळ जाहिर करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावाची छाननी तसेच आवश्यक ती माहिती संकलित करुन त्याबाबत कार्यवाही करणे जिल्हास्तरावर प्रस्तावित आहे.

---

**डहाणू येथे नियोजित असलेल्या वाढवण बंदराला विरोध होत असल्याबाबत**

**(४७) ३९२६३ (२१-०१-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू येथे नियोजित असलेल्या वाढवण बंदराच्या विरोधात डहाणूच्या पश्चिम किनारपट्टीवरील शेतकरी, मच्छीमार, बागायतदार तसेच स्थानिक ग्रामस्थांनी व सर्व पक्षीय वाढवण बंदर विरोधी लोकप्रतिनिधी कृती समितीच्या मार्फत अनेकवेळा आंदोलने, मोर्चे काढून आपला विरोध शासनास निवेदनामार्फत वेळोवेळी कळविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये पालघर जिल्ह्यातील सर्व पक्षीय वाढवण बंदर विरोधी कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली निषेध म्हणुन पालघर जिल्हयात एक दिवसाचे निषेध आंदोलन करुन उग्र निदर्शने केली व शासनाचे लक्ष वेधले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची या विरोधासंदर्भात नेमकी भुमिका काय आहे तसेच सदरहू प्रकरणी शेतकऱ्यांच्या व स्थानिकांच्या हिताच्या दृष्टीने शासन कोणता निर्णय घेणार आहे,
(४) अद्यापही याबाबत निर्णय घेतला गेला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) चे उत्तर वाढवण येथे जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांचे सॅटेलाईट पोर्ट निर्माण करण्याकरिता शासनाच्या मान्यतेअंती महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांच्यामध्ये दिनांक ०५/०६/२०१५ रोजी परस्पर सामजस्यं करार स्वाक्षांकीत झाला.

सदर प्रकल्प केंद्र शासनाचा असून या बंदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

---

**केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी (UIDSSMT) योजनेमध्ये मंजूर झालेली कामे अमृत योजनेत समाविष्ट केल्याबाबत**

**(४८) ४२४८८ (०७-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या यु.आय.डी.एस.एस.एम.टी (UIDSSMT) या योजनेमध्ये मंजूर झालेली कामे आणि प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांचा अमृत (AMRUT) या नवीन योजनेत समावेश करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कोणकोणते प्रकल्प अशा रीतीने या नव्या योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, अमृत व युआयडीएसएसएमटी या दोन्ही योजनेमध्ये नगरपालिकांनी करावयाच्या अंशदानाच्या हिस्स्यांमध्ये बरीच तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे नगरपालिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, आर्थिक भार भरुन काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :** (१) व (२) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानाच्या मूळ फेज मध्ये मंजूर ज्या प्रकल्पांची भौतिक प्रगती दि.३१.०३.२०१४ रोजी ५० टक्के पेक्षा जास्त असलेले प्रकल्प व ट्रांझिशन फेज अंतर्गत मंजूर प्रकल्पांना अमृत अभियानांतर्गत निधी वितरण केले जाणार आहे.

(३), (४) व (५) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियानाच्या ट्रांझिशन फेज अतर्गत मंजूर व अमृत अभियानामध्ये समाविष्ट केलेल्या प्रकल्पांसाठी जिथे केंद्र हिश्याची रक्कम ८० टक्के वरुन ६० टक्के झाली आहे त्याठिकाणी सुधारीत वित्तिय आकृतीबंध हा ६० (केंद्र शासन) : २० (राज्य शसन) : २० (नागरी स्थानिक स्वराज्य संस्था) असा निश्चित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई आणि नवी मुंबईला जोडण्यासाठी एमएमआरडीएतर्फे मुंबई-ट्रांस हार्बर लिंक (एमटीएचएल) योजना राबविण्यात येत असल्याबाबत**

**(४९) ४४०६५ (१७-०५-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि नवी मुंबईला जोडण्यासाठी एमएमआरडीएतर्फे मुंबई-ट्रांस हार्बर लिंक (एमटीएचएल) योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशा प्रकारे उभारण्यात येणार आहे, तसेच हे काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, या योजनेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :** (१) होय.

(२) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १७,८४३ कोटी इतकी आहे. या किंमतीत बांधकामाची किमंत, महागाई, आकस्मिक बाबींवरील खर्च, भूसंपादन, प्रशासकीय खर्च, बंधकामाच्या कालावधीतील व्याज इ. बाबींचा समावेश आहे.

सदर प्रकल्पाची अंमलबजावणी जायका (Japan International Co-operation Agency) या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीच्या ८५% इतक्या म्हणजेच सुमारे रु. १५,१००/- कोटी कर्ज प्राप्त करुन करण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पाचा बांधकाम कालावधी सुमारे साडेचार वर्ष इतका आहे.

(३) सदर प्रकल्पाकरिता कंत्राटदार नेमण्याची पूर्व अर्हता प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

**कोपरखैरणे ते घाटकोपर उड्डाणपूल बांधणेबाबत**

**(५०) ४४१२५ (१७-०५-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर ते कोपरखैरणे असा उड्डाणपुल बांधण्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी एमएमआरडीएने मे.एन.पी.ब्रिजींग कंपनीची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने सदर पुलाच्या बांधकामासंबंधीचा फिजीबल अहवाल एमएमआरडीएला सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार उक्त पुलाचे बांधकाम कधीपासून सुरु करण्यात येणार आहे,

(४) अद्याप अहवाल सादर करण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :** (१) विक्रोळी ते कोपरखैरणे या पुल बांधकामाबाबतचा सुसाध्यता अहवाल तयार करण्याकरीता मे.एन.पी.ब्रिजीग या सल्लागाराची नियुक्ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) सदर पुलाच्या मुंबई व नवीन मुंबई बाजूकडील विकिरण व्यवस्थेकरिता बृहनमुंबई महानगरपालिका मुंबई ताहतूक पोलीस, नवी मुंबई महानगरपालिका, सिडको, नवी मुंबई वाहतूक पोलीस, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ इ.शी. चर्चा करुन सुसाध्य विकिरण व्यवस्था अंतिम करण्याचे काम सल्लागाराकडून प्रगतीपथावर असून सल्लागारामार्फत लवकरच अहवाल प्राप्त होणे अपेक्षित आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.